Phon No.: -020-26123066/67 Email: nts.msce@gmail.com Website:www.mscepune.in

**अधिसूचना** क्र.मरापप/NTS/इ.10वी/2018-19/6791

परीक्षा प्राधान्य

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1.

दिनांक : 16 /08/2018

प्रति,

1. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
   जिल्हा परिषद------------------- (सर्व)
2. शिक्षण निरीक्षक,
   बृहन्मुंबई (दक्षिण/पश्चिम/उत्तर विभाग)

**विषयः- राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) 2018-19**
**इ. 10 वी साठी राज्यस्तर परीक्षा दि. 04 नोव्हेंबर, 2018**
**राष्ट्रीयस्तर परीक्षा दि. 12 मे, 2019 अधिसूचना व आवेदनपत्रे स्विकृतीबाबत.**

उपरोक्त परीक्षेबाबत राज्यस्तरीय राष्ट्रीय प्रज्ञाशोध (NTS) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर दि.16.08.2018 ते 14.09.2018 पर्यंत उपलब्ध होणार आहेत. सदर परीक्षेची सर्व माहिती, माहितीपत्रक व ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्याच्या सूचना परिषदेच्या संकेतस्थळावर टाकण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त सर्व सूचनांचा विचार करुन प्रशालांनी खालीलप्रमाणे कृती करणे अपेक्षित आहे.

1. सदर परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या शाळेची माहिती शाळेचा युडायस कोड (UDISE Code) ने लॉगीन करुन भरणे.
2. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रासाठी आवश्यक असणारी माहिती, जात व दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या सत्यप्रती चे आवश्यक फीसह संकलन करणे.
3. परीक्षा शुल्क प्रती विद्यार्थी रु. 150/- तसेच शाळा/संस्था संलग्नता शुल्क रु. 200/- प्रतिसंस्था, प्रति शैक्षणिक वर्ष रक्कमेचा भरणा NTS परीक्षेसाठी स्वतंत्रपणे इ-बँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड इ. द्वारे ऑनलाईन पध्दतीने भरावे लागेल. (चलनाद्वारे ऑफलाईन शुल्क भरता येणार नाही.)
4. एकदा भरलेल्या आवेदनपत्रात पुन्हा दुरुस्ती केली जाणार नाही. त्यामुळे सर्व माहितीची खातरजमा करुनच आवेदनपत्र Submit करावे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -1.

प्रत- माहितीस्तव सादरः

1. मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे- 1.
2. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - 30

माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

1. शिक्षण उपसंचालक, -------------------- (सर्व विभाग)
2. संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

## 17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 411 001

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा(NTS) इ. 10 वी साठी 2018-19

राज्यस्तर परीक्षा दि. 04 नोव्हेंबर 2018 राष्ट्रीयस्तर परीक्षा दि.12 मे, 2019

## माहितीपत्रक

➢ **योजनेचे उद्दिष्ट-** इयत्ता 10 वीच्या अखेर प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुद्धिमत्ता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुध्दिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा करावी, ही या योजनेची उद्दिष्टे आहेत.

➢ **निवडपध्दती:-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन. सी. ई. आर. टी.) यांचेमार्फत 2012-13 पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा इ. 10 वी साठी दोन स्तरावर परीक्षा घेण्यात येते. अ) राज्यस्तर ब) राष्ट्रीयस्तर

## अ) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यस्तरीय):-

1. **पात्रता:-**

a) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य शाळेतील इयत्ता 10 वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनीस राज्यस्तर परीक्षेस बसता येते. त्यासाठी वयाची, उत्पन्नाची अगर किमान गुणांची अट नाही. तसेच कोणतीही पूर्व परीक्षा देण्याची अट नाही.

b) ओपन डीस्टन्स लर्निंग (ODL) स्कूल योजनेखाली नोंदविलेले खालील अटी पूर्ण करणारे विद्यार्थीही या परीक्षेसाठी पात्र ठरतात.

- 1 जुलै 2018 रोजी ज्यांचे वय 18 पेक्षा कमी आहे.
- जे नोकरी करीत नाहीत.
- जे इ.10 वी च्या परीक्षेला पहिल्यांदाच बसत आहेत.

2) **अर्ज करण्याची पध्दत:-** खालील वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन आवेदनपत्रे परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर शाळांना उपलब्ध होतील.

आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्याच्या जातीचे प्रमाणपत्र, दिव्यांगत्व प्रमाणपत्राची खात्री करुनच जात व दिव्यांगत्वाची माहिती भरावी. विद्यार्थ्याचा पासपोर्ट साईज फोटो तसेच मुख्याध्यापक व विद्यार्थी यांची स्वाक्षरी फॉर्म भरताना स्कॅन (scan) करुन अपलोड करणे आवश्यक आहे. अपूर्ण भरलेले फॉर्म संगणक स्विकृत करणार नाही. सविस्तर माहिती परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

3) शुल्क :- राज्यस्तर परीक्षेसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येते. एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली मार्फत घेण्यात येणाऱ्या द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेसाठी कोणतीही फी आकारण्यात येत नाही.

| अ.क्र | तपशील | दिनांक | शुल्क रु. | शाळा संलग्नता फी |
|---|---|---|---|---|
| 1 | नियमित आवेदनपत्रे | 16/08/2018 ते 14/09/2018 | 150/- | संलग्नता फी रु. 200/- प्रति संस्था प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी |
| 2 | विलंब आवेदनपत्रे | 15/09/2018 ते 22/09/2018 | 275/- | |
| 3 | अतिविलंब आवेदनपत्रे (विद्यार्थी जबाबदार असेल तर) | 24/09/2018 ते 29/09/2018 | 400/- | |
| 4 | अतिविलंब आवेदनपत्रे (शाळा/संस्था जबाबदार असेल तर) | | 525/- | |

4) परीक्षेच्या तारखा :-

| परीक्षास्तर | राज्य / प्रदेश / विभाग | दिनांक |
|---|---|---|
| प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षा | मिझोराम, मेघालय, नागालँड आणि अंदमान व निकोबार बेटे येथील परीक्षेचा दिनांक | शनिवार दि. 03/11/2018 |
| | **महाराष्ट्रासह इतर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश येथील परीक्षेचा दिनांक** ⇒ | **रविवार दि. 04/11/2018** |
| द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षा | सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेश येथील परीक्षा | रविवार 12 मे, 2019 |

5) राज्यस्तरीय परीक्षेचे विषय व वेळापत्रक:- महाराष्ट्रातील विविध केंद्रावर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही परीक्षा घेते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व विषय खालील प्रमाणे असतात.

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण (प्रत्येक विषयात किमान) |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | बौध्दिक क्षमता चाचणी Mental Ability Test | 100 | 100 | 120 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 30 मिनिटे जादा वेळ) | 10.30 ते 12.30 | 40% (SC, ST व दिव्यांग 32%) |
| | | | विश्रांती | | | |
| 02. | शालेय क्षमता चाचणी Scholastic Aptitute Test | 100 | 100 | 120 मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी 30 मिनिटे जादा वेळ) | 13.30 ते 15.30 | 40% (SC, ST व दिव्यांग 32%) |

अ) पेपर -1ला :- बौध्दिक क्षमता चाचणी (MAT)

ही मानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारणभाव, विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित 100 बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील. = एकूण 100 गुण

ब) पेपर - 2रा :- शालेय क्षमता चाचणी (SAT)

ही सामान्यत: 9 वी व 10 वीच्या नविन अभ्यासक्रमांवर आधारित असेल. त्यामध्ये 1) सामान्य विज्ञान 2) समाजशास्त्र 3) गणित असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण 100 प्रश्न सोडवायचे असतात. सामान्य विज्ञान 40 गुण + समाजशास्त्र (इतिहास, राज्यशास्त्र व भूगोल) 40 गुण + गणित व भूमिती 20 गुण = एकूण 100 गुण

➢ **उपविषयवार गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

a) सामान्य विज्ञान 40 गुण:- भौतिकशास्त्र 13 गुण, रसायनशास्त्र 13 गुण, जीवशास्त्र 14 गुण.

b) सामाजिक शास्त्र 40 गुण:- इतिहास 16 गुण, राज्यशास्त्र 08 गुण, भूगोल 16 गुण.

c) गणित 20 गुण :- बिजगणित 10 गुण, भूमिती 10 गुण.

6) **माध्यमः-** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, कन्नड व तेलुगू या सात माध्यमातून उपलब्ध असतील. (सर्व विद्यार्थ्यांना मूळ माध्यमाबरोबर इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका एकत्र देण्यात येणार आहे.) यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. प्रश्नपत्रिकेत काही शंका निर्माण झाल्यास इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका मूळ प्रत म्हणून पहावी. दोन्ही प्रश्नपत्रिकांसाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिल्या जातील. प्रत्येक प्रश्नक्रमांकापुढे पर्यायांसाठी 4 वर्तुळे असतील. योग्य पर्यायाचे वर्तुळ काळे/निळे बॉलपेनने पूर्णत: रंगवून उत्तर नोंदवायचे आहे. पेन्सिलचा वापर केलेली व अपुरी उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत. एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, व्हाईटनर/खाडाखोड करुन नोंदविलेली किंवा गिरवलेली उत्तरे यांना गुण दिले जाणार नाहीत.

7) **विद्यार्थ्याचे प्रवेशपत्रे:-** ऑनलाईन फॉर्म व फी भरलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे परिषदेच्या <u>www.mscepune.in</u> व <u>http://nts.msceschólarshipexam.in</u> या संकेतस्थळावर शाळांना परीक्षेपूर्वी 10 दिवस अगोदर उपलब्ध होतील. सदर प्रवेशपत्रे काढून विद्यार्थ्यास देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची असेल.

8) **परीक्षेचे मूल्यमापनः-** विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येते. खबरदारीचे सर्व उपाय योजून बिनचूक गुणयादी तयार करण्यात येते. गत वर्षी राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी NCERT नवी दिल्ली यांचेकडून महाराष्ट्रासाठी एकूण 387 एवढा कोटा देण्यात आलेला होता. **या वर्षापासून उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब राज्यस्तर व राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी केला जाणार नाही.**

9) **गुणपडताळणी :-** सदर परीक्षेसाठी गुणपडताळणी केली जात नाही. सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना कार्बनलेस उत्तरपत्रिका देण्यात येते तसेच अंतिम उत्तरसूची परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात येते त्यामूळे विद्यार्थी त्यांच्या स्वत:च्या गुणांची गणना करु शकतात.

10) **<u>आरक्षण</u> :-**

अनुसूचित जातींसाठी (SC) 15% शिष्यवृत्त्या, अनुसूचित जमातींसाठी (ST) 7.5% शिष्यवृत्त्या आणि सन 2018-19 पासून <u>www.ncbc.nic.in/user_panel/centrallIststateview.aspx</u> या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या केंद्रीय सूचीनुसार (Non-creamy layer) इतर मागास संवर्गासाठी (OBC) 27% शिष्यवृत्त्या राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच दिव्यांगांसाठी 4% आरक्षण प्रत्येक संवर्गात लागू करण्यात आले आहे. (a), (b), and (c) प्रत्येकी 1% आरक्षण व (d), (e) या साठी 1% आरक्षण प्रत्येक संवर्गात लागू करण्यात आले आहे.

(a) blindness and low vision : (BLV)

(b) deaf and hard of hearing : (DH)

(c) locomotors disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid attack victims and muscular dystrophy: (LD)

(d) autism, intellectual disability, specific learning disability and mental illness : (AID)

(e) multiple disabilities from amongst persons under clauses (a) to (d) including deaf blindness in the posts identified for each disabilities: (DH)

11) **विद्यार्थ्यांची निवड :-** विद्यार्थ्यांची निवड दोन स्तरावर करण्यात येईल.

a) **प्रथमस्तर (राज्यस्तर):-** संबंधित राज्यस्तर/केंद्रशासित प्रदेशाच्या लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची निवड 'राष्ट्रीय स्तरासाठी' करण्यात येईल.

b) **द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर):-** प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेतून यशस्वी झालेले विद्यार्थी द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेसाठी बसू शकतील. सदर परीक्षा एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येते.

12) **पात्रता गुण :-** MAT व SAT विषयासाठी प्रत्येक विषयात General संवर्गासाठी 40% गुण व S.C, ST व दिव्यांगासाठी 32% गुण आवश्यक आहेत.

13) **निकाल घोषित करणे:-** प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेचा निकाल साधारण जानेवारी 2019 च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. सदर परीक्षेचा निकाल व निवडयादी फक्त परिषदेच्या संकेतस्थळावरच उपलब्ध केली जाईल. जिल्हयानी, शाळांनी व विद्यार्थ्यांनी सदरचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावरुनच प्राप्त करुन घ्यावयाचा आहे.

14) **परदेशात शिकणारे भारतीय विद्यार्थी :-** परदेशात शिकणारे भारतीय विद्यार्थी इ. 10 वी समकक्ष इयत्तेत शिकत असतील तर प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेला न बसता थेट द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेस बसू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्याने एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध माहितीप्रमाणे आवश्यक पत्रव्यवहार करुन संगणकावरुन घेतलेले आवेदनपत्र सादर करावे. सदर आवेदनपत्रासोबत त्याच्या मागील वर्षीच्या गुणपत्राची सत्यप्रत जोडून ते दि. 31 डिसेंबर 2018 पूर्वी एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

15) **अनधिकृततेबाबत इशारा -**

एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे शिवाय अन्य कोणत्याही संस्थेस या प्रकारची परीक्षा किंवा पूर्व परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे, शिष्यवृत्ती देणे या करिता महाराष्ट्रात प्राधिकृत करण्यात आलेले नाही. अशा संस्थाबाबतची कोणतीही जबाबदारी एन्.सी.ई.आर्.टी., नवी दिल्ली / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेवर राहणार नाही.

## ब) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राष्ट्रीयस्तर):-

1) **राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा:-** राज्यस्तर परीक्षेत गुणानुक्रमे निवड झालेल्या विद्यार्थ्यांनाच राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी बसता येते. ही परीक्षा राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद (N.C.E.R.T.) नवी दिल्ली यांचेमार्फत 12 मे 2019 रोजी घेण्यात येणार आहे. (गत वर्षी सदर परीक्षा मुंबई आणि पुणे येथील परीक्षा केंद्रावर घेण्यात आली आहे.) सदर परीक्षेसाठी वेळापत्रक व प्रवेशपत्र NCERT नवी दिल्ली यांचे मार्फत साधारण एप्रिल 2019 च्या शेवटच्या आठवड्यात संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

2) परीक्षेचे मूल्यमापनः- मागील वर्षापासून विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेचे मूल्यांकन करताना वजा गुण (Negative Marking) पध्दतीचा अवलंब राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी केला जात नाही.

3) निकाल घोषित करणेः- द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेचा निकाल एन्.सी. ई.आर्.टी., दिल्ली यांचेमार्फत घोषित केला जातो.

4) शिष्यवृत्तीः- अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्ती संख्या 1000 असून यासाठी SC साठी 150, ST साठी 75, केंद्रीय सूचीनुसार (Non-creamy layer) OBC साठी 270 आणि खुल्या प्रवर्गासाठी 505 शिष्यवृत्त्या ठरवून दिलेल्या आहेत. तसेच संबंधित संवर्गात 4% दिव्यांगांसाठी आरक्षण असेल.

5) प्रमाणपत्रः-

a) राज्यस्तर परीक्षेतून राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल.

b) राष्ट्रीयस्तर परीक्षेतून शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना 15 ऑगस्ट 2020 रोजी जिल्ह्याच्या पालकमंत्र्याच्या हस्ते प्रमाणपत्र दिले जाईल.

6) शिष्यवृत्ती दरः- शिष्यवृत्ती धारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रू. |
|---|---|---|
| 1 | शालान्त परीक्षेनंतर + 2 स्तरावर दोन वर्ष (इ.11 वी व इ.12 वी) | 1250 |
| 2 | सर्व शाखांच्या प्रथम पदवीपर्यंत (उदा. B.A., B.COM. B.Sc.) | 2000 |
| 3 | सर्व शाखांच्या द्वितीय पदवीपर्यंत (पदव्युत्तर पदवीपर्यंत) | 2000 |
| 4 | Ph. D. साठी 4 वर्षांपर्यंत<br>(व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे<br>नियमानुसार मान्य दराने |

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -1.